# विधवा महिलांच्या समस्या व समाजसुधारकांची कार्य

**डॉ. पोपळघट राजू शेषराव**

*समाजशास्त्र विभागप्रमुख*

*राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय*

*पाथ्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद*

जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या सर्वेक्षणामध्ये सांगितल्याप्रमाणे भारतामध्ये येत्या काही वर्षांमध्ये वृद्ध महिलांचे प्रमाण वाढणार आहे. या महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी केंद्र सरकारने आत्तापासून तरतुदी करायला पाहिजे अशी सूचना जागतिक आरोग्य संघटनेने सर्वेक्षणामध्ये केलेली आहे यामध्ये सर्वात जास्त समस्या विधवा महिलांना जाणवतात भारतामध्ये सर्वात जास्त विधवा महिलांचे व घटस्फोटित महिलांचे प्रमाण तामिळनाडूमध्ये 8.8 टक्के आढळून आलेले आहे. महाराष्ट्रात विधवांचे एकाकी आयुष्य जगणाऱ्या महिलांचे प्रमाण मोठे असून पहिल्या पाच राज्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात विधवा महिलांचे प्रश्न अनेक वर्षापासून चालत आलेले आहेत. देशात बालविवाह प्रथे मुळे अनेक तरुण महिलांच्या जीवनात वैधव्य येऊ लागले. त्यातही हिंदू समाजातील पती मृत पावलेल्या महिलांचे हाल जास्त मोठ्या प्रमाणात होत असे. तसेच वयाने खूप मोठ्या पुरूषांसोबत विवाह लावल्याने महिला तारुण्यात विधवा होऊ लागल्या या महिलांच्या आयुष्यात एकाकीपणा, परावलंबी जीवन येत असे. ब्राह्मण समाजामध्ये विधवांचे केशवपन केले जात असे, त्यांना विशिष्ट रंगाचे कपडे परिधान करावे लागत असेल, ठराविक आहार, घराबाहेर जायचे नाही, समाजात मान नाही, ज्या घरात राहणार त्या घरातील आयुष्यभर सर्व कामे करावी लागत असे. अनेकदा घरातील किंवा बाहेरच्या व्यक्तींची वक्रदृष्टी त्यांच्यावर पडत असे यातून काही महिला गरोदर राहिल्या तर त्यांना आत्महत्या केल्याशिवाय पर्याय उरत नसे तिने आत्महत्या केल्यानंतर घरातील मंडळी देखील बरी पीडा गेली असे संबोधत असे भारतीय समाज सुधारकांनी विधवा पुनर्विवाहाच्या मुद्द्यावर इंग्रज सरकारला साथ दिली व 1856 मध्ये हिंदू पुनर्विवाह कायदा तयार केल्याने काही प्रमाणात विधवा महिलांच्या समस्येचे प्रमाण कमी झाले. तसेच महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी विधवा परित्यक्ता आणि कुमारी मातांना आश्रय देऊन त्यांना जगण्याचा एक मार्ग दाखवला. पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये महिलांना कमी लेखले जात असमुळे महिलांचा जन्म झाला की तिचा सांभाळ आई-वडील करतात, लग्न झाल्यानंतर पती सांभाळतो तर वृद्धप काळामध्ये मुलं सांभाळतात कारण आयुष्यभर महिला दुसऱ्यांवर विसंबून रहात असल्याने विधवांचे हाल होतात. आधुनिक काळात ही परिस्थिती बदलून महिला स्वतःच्या पायावर उभा राहत आहे.

**विधवाचा अर्थ :-**

पती व पत्नी यांचे वैवाहिक जीवन हे त्यांच्यापैकी एका व्यक्तीच्या मृत्यूमुळे संपुष्टात येते. तिचा पती निधन पावला आहे व तीने पुन्हा लग्न केले नाही अशी म्हणजे विधवा होय तर त्याची पत्नी मरण पावली आहे व ज्याने पुन्हा लग्न केले नाही असा पुरुष म्हणजे विधुर होय.

**प्राचीन कालखंडातील विधवांची स्थिती :-**

प्राचीन कालखंडामध्ये विधवांचे मोठ्या प्रमाणात हाल झालेले आपल्याला दिसते. प्राचीन समाजामध्ये विधवेला तिच्या मृत पतीच्या थडग्यावर जिवंत पुरत असत प्राचीन भारतीय धर्मशास्त्र व नीतिनियम यानुसार विधवेला पतीच्या मरणास कारणीभूत धरल्याने ती पापी व अमंगल आहे हि समाजाची धारणा बनली. तिने कुटुंबातील मंगल प्रसंगी उपस्थित राहू नये असा प्रघात पडला. विधवा स्त्रीने सुतक किती दिवस पाळावे, तिने कोणते वस्त्र परिधान करावे, तिने घराबाहेर पडावे की नाही तिने कोणाशी बोलावे कोणते, अन्न किती वेळा ग्रहण करावे याबद्दल विविध समाजात विविध बंधने विधवेवर लाधलेली दिसून येतात. पती निधनाचे पातक शोधून काढण्याकरिता प्रायश्चित्त म्हणून ही बंधने तिने पाळलीच पाहिजे असा समाजाचा मानक. असे हिंदू समाजात धर्मसूत्रे आणि मनुस्मृती यांच्यामुळे विधवेच्या दैनंदिन व्यवहारावर कडक बंधने घातलेली आढळतात.

**प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीतील विधवेची स्थिती :-**

प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीमध्ये विधवेच्या पुनर्विवाहाला फारसे प्रोत्साहन नव्हते. प्रारंभीच्या ख्रिस्ती समाजातील पुनर्विवाह हा विवाहपूर्व शरीरसंबंध अगर विचार यांच्या इतकाच निंदनीय व त्याज्य मानला जाई. प्राचीन भारतात धर्मशास्रा नुसार विधवेचा पुनर्विवाह निषेध ठरविला गेला. मात्र मनुस्मृती या ग्रंथांमध्ये नियोग प्रथेचा उल्लेख येतो. या नियोग प्रथेमध्ये विधवा स्त्रीला विधीपूर्वक आपल्या दिराशी समागम करण्याची परवानगी दिलेली असते. मात्र मनुस्मृतीमध्ये नियोग प्रथेत फक्त संततीच्या व वंशवृद्धीच्या दृष्टीने मान्यता दिलेली आहे. स्त्रीने दिरा सोबत समागम करून वंशाचे नाव कुटुंबाची मालमत्ता व्हावी या दृष्टीने ही तडजोड असावी स्त्री ही फक्त प्रजोत्पादनाचे साधन आहे ही अनिष्ट

विचारसरणी या परंपरेला आधारभूत ठरली. मात्र सर्वसाधारणपणे भारतीय समाजामध्ये पुनर्विवाह संमती नसे तरुणपणी वैधव्य आलेल्या स्त्रीची यामुळे अतिशय कुचंबणा होत असावी तिच्याकडे संशयाने पाहण्याचा दृष्टिकोन सर्वत्र आढळतो. तिच्यावर पर पुरुषांची नजर जाऊ नये म्हणून अनेक जाचक निर्बंध घातले. याबरोबर तिचे केशवपन करण्याची क्रूर चाल भारतात निर्माण झाली. भारतात पुनर्विवाहाला बंदी घालण्याबरोबरच बालविवाह व जठर बालविवाह या घातक प्रथांमुळे विधवांचे प्रश्न अधिकच गंभीर बनले. बालविवाह मुलीला अल्प वयात वैधव्य येत असल्याने अशा बालवीर विधवांच्या वाट्याला फक्त दुःख निराशा व अवहेलनाच येत असे. ब्राह्मण समाजाचा व्यतिरिक्त इतर जातींमध्ये मुळात पुनर्विवाहाला विरोध नव्हता पण प्रतिष्ठेच्या व सामाजिक मान मर्तबा च्या चुकीच्या कल्पनांमुळे कनिष्ठ जाती मध्ये देखील पुढे पुनर्विवाह गौण ठरवले गेले. तो विवाह मंत्र पठण करून आणि मांडव घालून हा विवाह साजरा होत नसेल. मृत पतीच्या मृत्यूनंतर ही आपल्या पत्नीवर हक्क असतो या भ्रामक समजुतीमुळे परलोकात तिने त्याची सेवा करावी व म्हणून देहत्याग करावा ही भावना भारतीय समाजात तीव्र झाली त्यामुळे भारतामध्ये मुर्त पतीच्या बरोबर पत्नीने सहगमन करुन विधवेला सक्ती करून व जबरदस्तीने पतीच्या चितेवर जाळण्याचे प्रकार घडू लागले याला धार्मिक अधिष्ठान दिले गेले असलेतरी कोणत्याही धर्मग्रंथात स्पष्ट उल्लेख नाही. महाभारतात पांडूची पत्नी माद्री सती गेली पण ही प्रथा तेव्हादेखील सक्तीची नव्हती. महाराष्ट्रात उच्च कुळे पेशवे व सरदार यांच्या स्त्रिया सती जात थोरल्या शाहू महाराजांची पत्नी, माधवराव पेशव्यांची पत्नी रमाबाई, संभाजी आग्रे यांची पत्नी अशी सतीची उदाहरणे इतिहासात प्रसिद्ध आहे. सहगमनाचा मार्ग हा स्त्रियांनी बहुदा मुसलमानांनी आक्रमणाच्या प्रसंगी धर्मांतर आणि अत्याचार यांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी स्वीकारला असावा. विधवेला पतीबरोबर मारून टाकण्याची पद्धत केवळ भारतामध्येच नव्हे तर प्राचीन युरोपीय संस्कृती मध्ये तसेच चीनमध्येही चौदाव्या शतकापर्यंत रूढ होती. परंपरागत समाजातील विधवेच्या प्रश्नांचे स्वरूप हे बालविवाह, सती, केशवपन या सारख्या अनिष्ट रूढी निगडीत असल्याने मानवतेच्या व नैतिकतेच्या दृष्टिकोनातून विधवा स्त्रियांच्या समस्या हाताळणे आवश्यक होते. त्या दृष्टीने एकोणिसाव्या शतकात काही पुरोगामी विचारांच्या नवशिक्षित सुधारकां कडून समाज सुधारणांचे जोरदार प्रयत्न सुरू झाले. केशवपन सारख्या अघोरी चाली विरुद्ध समाजसुधारकांनी लढे दिले. व्यंकटेश रंगो कट्टी यांनी विधवावपण- अनाचार हे पुस्तक लिहिले. लोकहितवादी आगरकर यांनी रूढी नष्ट व्हावी म्हणून आवाज उठवला. सतीच्या अमानुष चालीविरुध भारतात चळवळ उभी राहिली. बंगालमध्ये राजा राम मोहन रॉय यांनी या चाली च्या विरोधात जे प्रयत्न केले त्यांचा परिणाम गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम च्या कारकिर्दीत 1829 कायद्याने सतीच्या चाली वर बंदी घालण्यात आली.

**विधवा पुनर्विवाह**

समाज सुधारकांनी विधवांच्या पुनर्विवाह बाबत चळवळी सुरू केल्या 1855 मध्ये बंगालमध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा विवाहाची मागणी करणारा अर्ज सरकारकडे पाठवला. तसेच त्यांनी पुनर्विवाहाच्या पुष्ट्यर्थ ग्रंथही लिहिला या ग्रंथात विधवा विवाहाला पाठिंबा देणारे दाखले धर्मशास्त्रात दाखवले आहेत . विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांनी विधवेशी विवाह केला 1856 मध्ये हिंदू विधवा पुनर्विवाहाचा अधिनियम मंजूर झाला. मात्र पुनर्विवाहाच्या वेळी स्त्री अल्पवयीन विधवा असल्यास विवाहसंस्थेच्या पालनकर्त्याची संमती आवश्यक मानली गेली. त्यामुळे कायद्याने पुनर्विवाह ला मिळालेली मान्यता हवी तितकी प्रभावी ठरली नाही. बालविवाहाला विरोध करणे व विवाहाचे वय वाढविणे याकरिता बंगालमध्ये व महाराष्ट्रात प्रयत्न सुरू झाले. महाराष्ट्रात जगन्नाथ शंकर शेठ, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी या कार्यास वाहून घेतले 1865 मध्ये मुंबईत 'विधवाविवाहउत्तेजक मंडळाची' स्थापना झाली. या सभेत महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी, काशिनाथ त्र्यंबक तेलंग यासारखी मातब्बर मंडळी होती. गो. ग. आगरकर यांनीही विधवांच्या पुनर्विवाहाचा हिरिरीने पुरस्कार केला पुनर्विवाहाच्या कार्यात ही महत्त्वपूर्ण योगदान धोंडो केशव कर्वे यांचे आहे. 1893 मध्ये त्यांनी बाल विधवेशी विवाह केला व सनातनी लोकांचा रोष ओढवून घेतला. विधवाविवाह बरोबरच स्त्री शिक्षणा समाजात प्राधान्य मिळावे यासाठी लोक जागृती चे प्रयत्न महर्षी कर्वे व महात्मा फुले यांनी केले 1900 मध्ये महर्षी कर्वे यांनी हिंगणे येथे विधवांसाठी आश्रम स्थापन केला. विवाह वरील बंदी मुळे एखादी तरुण विधवा फसली तर त्यातून गर्भपात अथवा भ्रूणहत्या घडण्याचे प्रश्न त्या काळात होतेच लोकहितवादी व महात्मा फुले यांनी या प्रश्नाला वाचा फोडली. महात्मा फुले यांनी पुण्यात बालहत्या प्रतिबंधक गृह 1863 काढून असहाय्य विधवा माता व बालके यांना आश्रय देण्याची सोय केली. एकोणिसाव्या व विसाव्या शतकामध्ये विधवा स्त्रीला तिचे हक्क प्रदान करणारे अनेक कायदे संमत केले गेले. 1937 मध्ये हिंदू स्त्रियांच्या संपत्ती विषय अधिकाराचा अधिनियम मंजूर झाला त्या अन्वे विधवा स्त्रीला तिच्या मुलांच्या बरोबरीने पतीच्या मालमत्तेचा वारस हक्क दिला गेला. हिंदू विधवेची असहाय्यता व कुटुंबावरील आर्थिक अवलंबित्व यामुळे संपुष्टात यावे ही धारणा या कायद्यात होती.

स्वातंत्र्योत्तर काळात 1956 मध्ये हिंदू उत्तराधिकार अधिनियम संमत झाला. त्याच प्रमाणे दत्तक विधायक अधिनियमानुसार 1956 विधवेला मूल दत्तक घेण्याची कायदेशीर मुभा दिली गेली.

**विधवांचे प्रश्न :-**

आधुनिक समाजात पुरोगामी विचारसरणी व अनुकूल कायदे यामुळे काही प्रमाणात विधवा महिलांचे प्रश्न कमी झाले आहेत. तरी कोणत्याही समाजात स्त्रीच्या दृष्टीने तिच्या पतीचे निधन होणे ही मोठी दुर्दैवी आपत्ती ठरते कुटुंबातील पतीच्या निधनामुळे स्त्रीचे व पित्याच्या निधनामुळे मुलांचे आयुष्य बदलून जाते. आई, मुले नातेवाईक व इतर संबंधित व्यक्तींचे आपापसातले संबंध अपेक्षा यामध्ये अनेक फेरबदल व फेररचना घडून येतात विधवा स्त्रीला आर्थिक ताण तर सोसावे लागतातच शिवाय मुलांच्या पालनपोषणाची भार तिला सोसावा लागतो. तरुण विधवेला मानसिक ताण, शारीरिक कुचंबणा व पुरुषांकडून मानहानी सहन करावी लागते. पाश्चात्त्य समाजात देखील विधवा स्त्री कुटुंबापासून दुरावली जाते व तिला एकाकीपणा, असुरक्षितता या प्रश्नांचा सामना करावा लागतो. विधवा स्त्री ज्या विशिष्ट समाजव्यवस्थेत वावरते तो समाज, त्यातील स्थानिक गट व आर्थिक स्तर यानुसार तिच्या समस्या भिन्न- भिन्न रुपे धारण करतात. अविकसित व विकसनशील देशात स्त्रियांना शिक्षण, रोजगार व कायदेशीर हक्काची जाणीव कमी प्रमाणात असल्याने पती निधनामुळे विधवेचे जीवन अत्यंत कष्टप्रद बनते. वृद्ध विधवांचे प्रश्न आज अनेक विकसित देशातही गंभीर स्वरूपाचे बनले आहेत. जगातील अनेक देशांमध्ये विधवांचे प्रमाण विदुरा पेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहेत. याची दोन कारणे संभवतात पहिले स्त्रियांमधील दीर्घायुष्य असण्याचे जास्त प्रमाण व दुसरे पुनर्विवाहित स्त्रियांशी लग्न करण्याबाबत पुरुषांमध्ये असलेली नाराजी सहाजिकच एकाकी निराधार स्त्रियांचे प्रमाण अशा समाजात अधिक असते. वृद्धत्व वैधव्य या दुहेरी आपत्तीला तोंड देण्याकरिता अशा विधवांना कुटुंब, स्नेही व सेवभवी संस्था यांची मोठ्या प्रमाणात गरज भासते. वृद्धाश्रमांमध्ये निराधार विधवांची व्यवस्था काही प्रमाणात होत असावी तरी हा प्रश्न फक्त कायद्याने व वृद्धांसाठी संस्था स्थापन करुन सुटणार नाही हेही खरे आहे. आनंद वृद्ध विधवांना सेवाभावी संस्थांचा आश्रय कौटुंबिक आधार व त्यातून लागणारी सामाजिक सुरक्षितता यांची सर्वात जास्त आवश्यकता भासत असल्याने त्यादृष्टीने स्त्री याकरिता असलेल्या सवलती व तरतुदी यांचे नियोजन करतांना विधवांच्या प्रश्नांना अग्रक्रम देणे महत्त्वाचे आहे.

खऱ्या अर्थाने विधवांना त्यांच्या कुटुंबातील घराचा हक्क मिळत नाहीत. पतीच्या संपत्तीत वाटा मिळविण्यासाठी दीर्घकालीन लढावी लागते. कमी वयात विधवा झाल्यास अत्याचारांना सामोरे जावे लागते. दुसरे लग्न केलं तर मुलावर चा हक्क सोडावा लागतो. वृद्ध विधवा स्त्रियांना कुटुंबात स्वीकारले जात नाहीत. त्याच्या एड्समुळे पतीचे निधन झाले तर त्याचा सगळा दोष तिला दिला जातो. कमी वयातील विधवांना शारीरिक, मानसिक व्याधी जडण्याचा धोका असतो. नैराश्याचे प्रमाण अधिक वाढते.

**शासनाने करावयाचे उपाय योजना :-**

विधवा महिलांच्या अनेक समस्या असल्या तरीदेखील शासने वेगवेगळ्या उपाययोजनांच्या माध्यमातून त्यांना आधार दिला पाहिजे. त्यामध्ये विधवा, परित्यक्ता आणि घटस्फोटित महिलांसाठी वेगळी धोरण शासनाने आखले पाहिजे. या महिलांना राहण्यासाठी आणि जीवन जगण्यासाठी शेत जमीन त्याचबरोबर घरकुल उपलब्ध करून दिली पाहिजेत. अन्नसुरक्षा योजनेचा लाभ दिला पाहिजे, दारिद्र रेषेखालील रेशन कार्ड उपलब्ध करून दिले पाहिजेत, सर्व शासकीय योजनेचा या अशा समस्याग्रस्त महिलांना लाभ दिला पाहिजे. मुलांसाठी शिक्षण हक्क कायद्यातील 25 टक्के आरक्षण विधवा महिलांच्या मुलांना प्राधान्य दिले पाहिजे. शासकीय रोजगार नोकरीच्या ठिकाणी विशेष आरक्षण अशा समस्याग्रस्त महिलांना दिले पाहिजे.

**समारोप :-**

विधवा महिलांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करीत आहेत पतीच्या निधनानंतर आजही महिलांना उपेक्षित जीवन जगावे लागते त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय पातळीवर धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. अशा एकल महिला गटात मोडतात अगदी स्वतःच्या कुटुंबातून आणि समाजातून या महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला असतो. समाजातील खूप प्रवृत्ती वाईट नजरेने बघते अशा वेळी महिलांना प्रचंड मानसिक तणावातून जावे लागते. याशिवाय त्यांच्या रोजीरोटी पासून ते मुलांच्या संगोपनाचा चे प्रश्न सोडवताना दमछाक होते. म्हणूनच शासनाने विशेष धोरण आखून त्यांच्या रक्षणासाठी कायदेशीर तरतुदी करण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. *भारतीय सामाजिक व्यवस्था, राम आहुजा*
२. *समाजशास्त्र विश्वकोश, गोपाल लाल जैन*
३. *सामाजिक मुद्दे, रवींद्र मुदगल*
४. *भारतीय समाज मुद्दे और समस्या, डॉ. आलोक कुमार कश्यप, मनिष कुमार कश्यप*
५. *Social change in modern India, M.N. Srinivas*
६. *भारतीय समाज की रूपरेषा, भूषण सिंह*
७. *गुन्हेगारीचे समाजशास्त्र, पी. के. कुलकर्णी*